**<u>फौ.कि.अर्ज क्र. १०१/२०२६</u>**

अशोक सिताराम पवार

वि.

शासन / खोपोली पोलिस स्टेशन

## निशाणी क्र. १ खालील आदेश

१. अर्ज व त्यावरील सरकारी अभियोक्ता व अन्वेषण अधिकारी यांनी दाखल केलेले लेखील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

२. अर्जदार **श्री. अशोक सिताराम पवार** यांनी खोपोली पोलीस ठाणे यांच्याकडील गुन्हा क्र. २३९/२०२६ या गुन्ह्यातील १४०(३), १२७(७), ११५(२), ३५१(२), ३५२ सह कलम ३(५) अन्वये जप्त मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार क्र. MH-46 BZ-7086, चासिज नंबर MA3BNC22SMH374561, इंजिन नंबर K15BN9164790, रंग- मॅग्मा ग्रे ही परत मिळणेकामी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्जदार यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ निशाणी क्र. ४ सोबत गाडीचे आर.सी. बुकची व इन्शुरन्सची व्हेरीफाईड प्रत, एफ.आय.आर. ची प्रत, अर्जदाराच्या आधार कार्डची व्हेरीफाईड प्रत इ. कागदपत्रे अर्जदार यांनी दाखल केलेली आहेत.

४. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार क्र. MH-

46 BZ-7086 ही गाडी अर्जदार अशोक सिताराम पवार ह्यांची आहे. तसेच मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही अर्जदार यांची स्वतःची खरेदी मालकीची असून तशी कागदपत्रे अर्जदार यांचे नावाची नोंद असलेले दाखल आहेत. त्यामुळे अर्जदार हे सदर मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कारचे मालक असल्याचे दिसुन येत आहे. तसेच अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कारची मागणी केलेली नाही. त्यावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदार हेच सदर मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कारचे मालक आहेत. त्या अनुषंगाने अर्जदार यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

५. सदरची मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही जप्त केल्यापासून खोपोली पोलीस स्टेशन येथे पडून आहे. जर ती तशीच पडून राहीली तर खराब होईलच परंतु तिच्या उपभोगापासून अर्जदार हे वंचित राहतील. अर्जदारास मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही दैनंदिन वापरासाठी लागत आहे. सरकारी अभियोक्ता यांनी मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही अर्जदार यांना ताब्यात देण्यात येवू नये असे कथन केलेले आहे. तसेच अन्वेषण अधिकारी यांनी मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही अर्जदार यांना ताब्यात देण्यास हरकत घेतली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई आंबालाल देसाई वि. गुजरात राज्य (२००२) १० एससीसी २८३ या प्रकरणात प्रमेय घालुन दिले आहे की,

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ व ४५७ अन्वये मुद्देमाल तात्काळ परत करावा. सदर कलम ४५७ शी संबंधित भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३ असून वरील प्रमेय या कलमाला सुध्दा लागू आहेत. सदर खटल्याची सुनवाणी होवुन अंतिम निर्णय लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने वर नमूद प्रकरणात घालुन दिलेले प्रमेय पाहता जप्त मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही काही अटी व शर्तीवर अर्जदार यांच्या ताब्यात देणे न्यायोचित होईल. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. तपासी अधिकारी यांना असा आदेश करण्यात येतो की, त्यांनी जप्त केलेली मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार क्र. MH-46 BZ-7086, चासिज नंबर MA3BNC22SMH374561, इंजिन नंबर K15BN9164790, रंग- मॅग्मा ग्रे ही अर्जदार **श्री. अशोक सिताराम पवार** यांना पुढील अटींवर ताब्यात द्यावी.

अ) अर्जदाराने मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही त्यांचे ताब्यात देण्यापुर्वी **रु. ५,००,०००/–** चा सुपुर्तनामा तपासी अंमलदार यांच्या समक्ष सादर करावा. सदर तयार सुपुर्तनामा तपासी अंमलदार यांनी दोषारोपत्रासोबत न्यायालयात दाखल करावा.

**ब)** अर्जदार यांनी न्यायालयाचे परवानगीशिवाय जप्त मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार मध्ये कोणत्याही प्रकारे बदल अथवा हस्तांतरण करावयाचे नाही. न्यायालय आदेश करील तेव्हा मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही न्यायालयात हजर करायची आहे.

**क)** जप्त मारुती सुझुकी इंडिया लि. कंपनीची चार चाकी गाडी इरटिगा VXI CNG कार ही अर्जदार यांचे ताब्यात देतेवेळी त्याचा पंचनामा करण्यात यावा व त्याचे छायाचित्र काढण्यात यावे व ते कागदपत्र **फौ.चौ.अ.क्र. १०१/२०२६** मध्ये न्यायालयात दाखल करावे असे अन्वेषण अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते.

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.08.03 17:40:07 +0530

स्थळ – खालापूर. **(श्रीमती एस. एस. देशमुख)**
दिनांक – ०३/०८/२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, खालापूर.

## Certificate

I affirm that, the contents of the P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Smt. S. S. Deshmukh<br>CJJD & JMFC, Khalapur |
| Name of Steno | : | Shri. Rakesh S. Patil<br>Stenographer, Grade – III |
| Date of Order | : | 03/08/2026 |
| Order signed by P. O. On | : | 03/08/2026 |
| Date of PDF & Order uploaded on | : | 03/08/2026 |